# पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी

२ रा मजला, वैद्यकिय मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) साठी एकत्रित मानधनावर कंत्राटी पद्धतीने खालील पदे भरावयाची आहेत. याकामी खालीलप्रमाणे नमुद केलेल्या पदांकरिता शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | एकत्रीत मानधन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | प्रवर्गानुसार आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | स्त्रीरोगतज्ञ | ०१ | ७५,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस व स्त्रीरोग विषयातील पदवी (एम.डी./एम.एस./डी.एन.बी.) किंवा पदविका.<br>२) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी आवश्यक.<br>३) स्त्रीरोगतज्ञ या पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | खुला (Open) -०१ |
| २ | बालरोगतज्ञ | ०४ | ७५,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी./डी.सी.एच./ डी.एन.बी (बालरोग) पदवी परिक्षा उत्तीर्ण.<br>२) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी आवश्यक.<br>३) बालरोगतज्ञ या पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जा (SC)-०१<br>वि.जा.अ. (VJA) -०१<br>खुला (Open) -०२ |
| ३ | भूलतज्ञ | ०३ | ७५,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी./डी.एन.बी. (ॲनेस्थिशिया) पदवी.<br>२) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी आवश्यक.<br>३) भूलतज्ञ या पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जा (SC)-०१<br>इ.मा.व.(OBC)-०१<br>खुला (Open) -०१ |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (पुर्ण वेळ) | १० | ६०,०००/- | १) एम.बी.बी.एस. पदवी उत्तीर्ण आवश्यक.<br>२) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी आवश्यक.<br>३) वैद्यकिय अधिकारी या पदाचा कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.ज.(ST)-०१<br>वि.जा.अ.(VJA)-०१<br>इ.मा.व.(OBC)-०२<br>आ.दु.घ. (EWS)-०२<br>खुला (Open) -०४ |
| ५ | इपिडेमिऑलॉजिस्ट | ०१ | ३५,०००/- | Medical Graduate with Post Graduate Degree/Diploma in Preventive and Social Medicine / Public Health or Epidemiology (such as MD, MPH, DPH, MAE etc.)<br>**Or**<br>Any Medical Graduate (MBBS) with 3 years' experience in Epidemiology / Public Health<br>**Or**<br>M.Sc. in Life Sciences with 2 years MPH (Masters in Public Health) with three year experience. | खुला (Open) -०१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **Or**<br>M.Sc. (Epidemiology) with 2 years' experience in Public Health.<br>**Experience:**<br>Minimum 2 years' experience in issues related to Public Health Programmers or Epidemiology. | |
| ६ | गुणवत्ता आश्वासक सहाय्यक | ०१ | १८,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२) शासकिय परिक्षा मंडळाकडील मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. असणे आवश्यक.<br>३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य | खुला (Open) -०१ |
| ७ | फार्मासिस्ट | ०१ | १७,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील डी.फार्म (D.Farm)/बी फार्म. (B.Farm) पदवी आवश्यक<br>२) इंडियन/महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलकडील नोंदणी असणे आवश्यक<br>३) संगणक कामकाजाचे ज्ञान असणे आवश्यक<br>४) फामासिस्ट या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | इ.मा.व.(OBC)-०१ |
| ८ | लॅब टेक्निशियन | ०१ | १७,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी.ही पदवी आवश्यक<br>२) शासन मान्य संस्थेकडील डी.एम.एल.टी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३) संगणकवरील (MS, Excel and Word skill evaluation) कामकाजाचे ज्ञान असणे आवश्यक.<br>४) लॅब सहाय्यक या कामाचा अनुभव आवश्यक<br>५) लॅबटेक्निशियन या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | इ.मा.व.(OBC)-०१ |

<u>अटी व शर्ती-</u>

१) **इच्छुक उमेदवारांनी दि.०४/०७/२०२३ ते दि.१३/०७/२०२३ रोजी (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी- १०.०० ते सायंकाळी- ५.०० वाजेपर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, वैद्यकीय विभाग, दुसरा मजला येथे वरील विहित मुदतीत समक्ष येऊन अर्ज सादर करावा. वरील कालावधीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

२) इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करताना अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ५) इंडियन/महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलकडील नोंदणी व नुतनीकरण ६) शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ७) निवासी पुरावा ८) जातीचे प्रमाणपत्र ९) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटो या सह पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वरील आमच्या बद्दल ➡नोकरी विषयी या सदरामध्ये जाऊन अर्जाची प्रिन्ट काढून सदरचा अर्ज परिपुर्ण भरुन सादर करावयाचा आहे.

३) उपरोक्त नमूद सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रीत मानधनाची असून सदरचा प्रकल्प बंद होताच सदरची पदे आपोआप संपुष्टात येतील.

४) मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचेकडील क्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती १०६७०-११०१६/२०२३ दि.२७/०४/२०२३ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध पदांच्या पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना प्राप्त असून यामध्ये उमेदवारांना खालील प्रमाणे गुण देण्यात येतील.

५) **जाहिरातीमधील स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, भूलतज्ञ, वैद्यकीय अधिकारी (पुर्णवेळ) हि पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.**

१) Subject Knowledge (१०)
२) "Research & Academic Knowledge(१०)"
३) Leadership Quality (१०)
४) Administrative Abilities (१०)
५) Experience (10)
a) For Govt. Experience-2 marks for one year
b) For Private Experience-1 marks for one year
Total Experience-10 marks Maximum.
एकूण गुण-५०

६) **जाहिरातीमधील इपिडेमिऑलॉजिस्ट, गुणवत्ता आश्वासक सहाय्यक, फार्मासिस्ट व लॅब टेक्निशियन या पदांची गुणांकन पद्धतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविली जाईल.**

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % प्रमाणे proportion = ६० * ५० / १०० = ३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घेतली जाईल) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc. (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc. (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २० % प्रमाणे proportion = ६० * २० / १०० = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत.( १ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | **एकूण १०० गुण** |

७) यानुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमानुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर यादी बाबत आक्षेप असल्यास एक दिवसाची मुदत देण्यात येईल. परंतु उमेदवाराने आवश्यक पुष्ठयर्थ योग्य पुरावे सादर करणे बंधनकारक राहील.अशा प्रकारे प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन त्यानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

८) फार्मासिस्ट व लॅब टेक्नीशियन या पदांना कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापुर्वी त्याची कौशल्य चाचणी घेण्यात येईल. सदर कौशल्य चाचणीमध्ये सदर उमेदवार पात्र ठरल्यास त्यास नियुक्ती आदेश देण्यात येतील. उमेदवार अपात्र ठरल्यास त्याला तसे कळवले जाईल व पुढील पात्र उमेदवारास कौशल्य चाचणीकरीता बोलविण्यात येईल.

९) सदरची पदे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा. आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

१०) सदरची पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने प्रकल्पासाठी भरावयाची असुन सदर पदावरील उमेदवारांना प्रथम नियुक्ती दि.२९ जून २०२४ पर्यंत देण्यात येईल व कामकाजाच्या अहवालानुसार दि.३० जून २०२४ रोजी सेवेत खंड देवून दि.०१ जुलै २०२४

पासून पुढील पुर्ननियुक्ती देण्यात येईल. याबाबत शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचना लागू राहतील. तसेच सदरचा प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

११) सदरची नियुक्ती पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपाची आहे. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही ज्या दिवशी सोसायटीस सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा समाप्त केली जाईल.

१२) सदरच्या जाहिरामधील पदांच्या संख्येमध्ये अथवा आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

१३) मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचेकडील दि.२९/०९/२०१८ अन्वये सदर पदासांठी उमेदवारांची सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. तसेच सेवानिवृत्त उमेदवारांसाठी ६५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहील परंतु वय वर्षे ६० नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१४) अर्जदार हा संबंधित पदासाठी शरीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१५) कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असणे आवश्यक आहे.

१६) सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगीत करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१७) अनुभवाच्या बाबतीत शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य व खाजगी संस्था यांचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

१८) उपरोक्त पदांकरिता असलेल्या सर्व सूचना, तात्पुरती पात्र/अपात्र यादी, हरकती स्विकारणे, अंतिम पात्र/अपात्र यादी हया बाबी महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. तथापी याबाबत उमेदवारास कोणतीही वेगळी सूचना अथवा दुरध्वनी, एस.एम.एस., ई-मेल केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्याकरिता उमेदवारांनी वेळोवेळी महापालिकेच्या संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य राहील.

१९) मुलाखतीस बोलाविल्यानंतर पात्र असलेल्या उमेदवारांनी आवश्यक सर्व कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखत व कौशल्य चाचणीस उपस्थित रहावे. त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय नाही.

२०) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावा.

२१) सदर पदभरती अंतर्गत निवड करण्यात येणा-या उमेदवारांकडून सदरचे पदावर कायमस्वरुपी हक्क सांगणार नसलेबाबत र.रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

२२) सदर जाहिरातीमधील नमूद पदांची निवड समिती मार्फत निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८

जाहिरात क्र. ९६७ /२०२३
दि. 03 / 07 /२०२३.

## उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना

| फोटो |
|---|

प्रति,

मा. आयुक्त.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

विषय – ........................................... या पदासाठी अर्ज
संदर्भ - दि. - -२०२३ रोजीची जाहिरात

महोदय,

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी पध्दतीने ............................ या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे. माझा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | माहिती | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | आडनाव | | | नाव | | | वडील / पतीचे नाव | | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | | | | | | | | |
| ३ | ई-मेल | | | | | मोबाईल क्र. | | | | |
| ४ | जन्मतारीख | / / (जाहिरातीच्या दिनांकास अनुसरुन) | | | वय- | वर्षे- | | महिने- | | दिवस- |
| ५ | लिंग | पुरुष | | | स्त्री | | | | | |
| ६ | सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय | | | | | होय / नाही | | | | |
| | होय असल्यास | दवाखान्याचे नाव - | | | | पदनाम - | | | | |
| ७ | जात - | | | | जातीचा प्रवर्ग - | | | | | |
| | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | OBC | SBC | EWS | OPEN |
| | | | | | | | | | | |
| ८ | शैक्षणिक अर्हतेचा तपशील | | | | | | | | | |
| | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | | | मिळालेले गुण | | | टक्केवारी | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| ९ | तांत्रिक व इतर अर्हता तपशील | | | | | | | | | |
| | अ.क्र. | संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | | | | | | पदनाम | | कालावधी |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| १० | कौन्सिलकडील नोंदणी बाबत | नोंदणी- आहे/नाही | | | | | | कालावधी- | | |

सदरची पदे ही कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपातील नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात कोठेही व कोणताही दावा दाखल करणार नाही. वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चूकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकीच्या कोणत्याही टप्प्यावर या माहितीच्या आधारे महापालिका सेवेतून कमी करण्यास तसेच या भरतीकरीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ -　　　　　　　　　　अर्जदाराची सही -

दि.　　/　　/२०२३　　　　　　अर्जदाराचे नाव -----------------------------

सहपत्रे - अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.
१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे　　२) जन्मतारखेचा पुरावा　　३)अनुभवाची प्रमाणपत्रे
४) जात प्रमाणपत्र　　५) रहिवास पुरावा　　६) इतर कागदपत्रे.